# थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र

१, **पौल** आणि सिल्वान व तीमथ्य ह्यांच्याकडून थेस्सलनीकाकरांच्या मंडळी साठी जी परमेश्वर बाप आणि प्रभु येशू
२ ख्रिस्तात आहे, तुम्हांस कृपा व शांति असो. **आम्ही** आपल्या प्रार्थनामध्ये तुमची आठवण करतो आणि सर्वदा
३ तुम्हांसर्वांसाठी परमेश्वराची स्तुति करतो. **आम्ही** आपल्या परमेश्वर बापासमोर, तुम्ही विश्वासाने केलेली काम, तुमचे
४ प्रेमाचे श्रम आणि आपल्या प्रभु येशू ख्रिस्तातील आशेमुळे धरलेला धीर, यांना नेहमी स्मरण करतो. **बंधुंनो,**
५ परमेश्वराच्या प्रिय लोकांनो, आम्हांला माहित आहे की तुम्ही निवडलेले आहात, **कारण** आमचे शुभवर्तमान तुमच्या
जवळ केवळ शब्दाने नव्हे, परंतु सामर्थ्य आणि पवित्र आत्म्यात मोठया निश्चयाने तुम्हांपर्यंत पोंचले होते. तुम्हाला
६ ठाऊक आहे की आम्ही तुमच्यासाठी कसे बनलो होतो. **तुम्ही** फार संकटात असतांना पवित्र आत्म्याच्या आनंदाने
७ वचन ग्रहण केले आणि आमचे व प्रभुचे अनुकरण केले. **म्हणून** मासेदोनिया व अखयातील विश्वासू लोकांकरता आदर्श
८ झालात. **कारण** मासेदोनिया व अख्या यात तुम्ही प्रभुचे वचन दिले. इतकेच केवळ नव्हे तर परमेश्वरावरील तुमच्या
९ विश्वासाची चर्चा सर्वत्र पसरली आहे की त्यामुळे आम्हांला सांगण्याची गरज देखील नाही. **कारण** तुमच्याकडे आमचे

---

१:१ **"पौल''**- प्रेषित ८:१-३; १३:९ 'सिल्वान व सिला एकच व्यक्ति होय. प्रेषित १५:२२,४०.

**"तीमथ्य''** - प्रेषित १६:१-४. सिला (व कदाचित तीमथ्य) पौलासोबत मंडळीच्या प्रारंभी होते- प्रेषित १७:१-४,१०-१४.

"जो परमेश्वर बाप व प्रभु येशू ख्रिस्तात आहे "परमेश्वरात दोन व्यक्तिंना एक होण्याची सत्यता दर्शविते. (मत्तय ३:१६, १७; २८:१९; योहान १०:३०; १७:१-५; फिली २:६). विश्वासू "परमेश्वरात'' आहे. ते त्यांचे शरणस्थान, घर व आत्मिक जीवनाचा स्त्रोत आहेत. तुलना करा. स्त्रोत ९०:१; कलस्सै ३:३.

१:२ **"धन्यवाद''** - रोम १:८; १ करिंथ १:४; फिली १:८; कलस्सै १:३.

"आपल्या प्रार्थनेत'' - रोम १:९,१०; इफि १:१६; ३:१६; फिली १:४,९; कल १:३,९; २:१.

१:३ **"येथे''** ख्रिस्ती जीवनाचे तीन मोठे गुण आहेत आणि त्यातून काय निष्पन्न होते हे देखील. खरा विश्वास चांगले कार्य उत्पन्न करतो. पहा याकोब २:१४-१७,२६. येथे ग्रीक शब्द 'प्रेम'' "अगापे'' आहे. याला समजण्यासाठी १ करिंथ १३:१-१३ चे अध्ययन करा. यापासून काय उत्पन्न होते,, याद्वारेच प्रेम समजते आणि याच्या व्यवहाराने खरे प्रेम नेहमी दुसऱ्यांसाठी पश्रिमम करावयास तयार असते.

"आशा''- रोम ५:२-५; ८:२४,२५ पहा. त्यांची आशा परमेश्वरावर स्थिर असल्यामुळे त्यांना सार्वकालिक जीवाची प्रतिज्ञा दिली गेली आहे. तीताला १:२.

१:४ **"माहित आहे''** -खरे विश्वासू होण्याबाबतीत त्यांचे प्रमाण खरोखर फार जास्त आहे, ज्यामुळे पौलाला निश्चय होतो की परमेश्वराने त्यांना सार्वकालिक जीवनासाठी बोलवले आहे.

**"प्रिय लोकांनो''**- रोम ५:८; इफि ३:१८,१९; कलस्सै ३:१२; १ योहान ३:१.

**"निवडलेले आहात''** - मार्क १३:२०; योहान १३:१८; १५:१९; रोम ८:३३; इफि १:४,५,११; १ पेत्र१:२; २:९.

१:५-१० ही वचने या गोष्टीचे प्रमाण आहेत की पौलाला त्यांच्या तारणची निश्चयता होती. प्रथम, जेव्हा त्याने संदेश सांगितला, त्याने पवित्र आत्म्याचा अनुभव घेतला त्यांच्यातील परिवर्तन पाहिले. हे परिवर्तन असे होते की छळात देखील ते टिकून राहिलेत. यावरून कळले की ख्रिस्ताची साक्ष त्यांच्या जीवनात सत्यतेने व उत्साहाने कायम होती.

१:५ **"आमचा शुभ संदेश''**- ज्या संदेशाचा त्यांनी प्रसार केला तो येशू ख्रिस्ताने त्यांच्यावर प्रगट केला होता. (२:८; ३:२; गलती १:११,१२; रोम १:१६; १करिंथ १५:१-८)

**"सामर्थ्यात''**- प्रेषित १:८; १ करिंथ २:४,५, कल १:२९.

**"पवित्र-आत्म्यात''**-मत्तय ३:१६,१७; योहान १४:१६,१७; प्रेषित १:४; इफि ५:१८. परमेश्वराच्या आत्म्याच्या वातावरणात पौल जगत होता व दुसऱ्यांची सेवा करत होता.

**"मोठया निश्चयाने''**-पौल व या दोघांना या गोष्टी बद्दल खात्री होती की परमेश्वर त्यांच्यात कार्य करत आहेत.

**"कसे''** २:५-१२; प्रेषित २०:१८-२०,३३-३५ शी तुलना करा.

१:६ **"आमचे किंवा येशूचे अनुकरण केले''** ख्रिस्ती पुढाऱ्यांनी असे जीवन जगावे की सर्वांनी त्यांचे अनुकरण करावे. १ करिंथ ४:१६; ११:१; फिली ३:१७; २ थेस्स ३:७,९; १ तीमथ्य १:१६; ४:१२; तीताला २:७; इब्री ६:१२; १३:७; १ पेत्र ५:३.

**"मोठया संकटात''** - २:१४; प्रेषित १७:५-१० या गोष्टीमुळे त्यांनी सुवार्तेकडे दुर्लक्ष केले नाही. परमेश्वरांनी ज्यांना निवडले आहे ते कधीहि आपल्या मार्गातून भटकणार नाहीत.

**"आनंद''** - प्रेषित ८:८; १३:५२; १६:३४; रोम १४:१७. जे लोक सुवार्तेवर विश्वास ठेवतात, त्यांच्याच जीवनात परमेश्वराचा आत्मा आनंद उत्पन्न करतो.

१:७ **"आदर्श''**-जगातील सर्वात मोठया व्यक्तिस आदर्श बनवून पौल स्वत: सर्व विश्वासू लोकांकरता एक आदर्श बनला (१ करिंथ ११:१). ते पौलासारखे जगू लागलेत व इतरांसाठी देखील आदर्श बनलेत.

**"मोसेदोनिया व अखया''** - ज्याला आज ग्रीस म्हणतात, त्यावेळी त्यांचा समावेश थेस्सलनीका व मासेदोनियात होता.

१:८ **"सर्वठिकाणी अशी चर्चा पसरली आहे''**- खऱ्या विश्वासू लोकांप्रमाणे उघड-उघड ते ख्रिस्ताचे साक्षीदार होते.

१:९ **"मूर्त्यांपासून''**- तेथे अधिक विश्वासू परराष्ट्रीय होते, जसे आज देखील आहेत. त्यावेळी मूर्तिपूजा एक सामान्य गोष्ट होती. त्यांच्या परिवर्तनाचे एक स्पष्ट चिन्ह हेच होते की त्यांनी आपल्या मूर्त्या फेकून दिलयात आणि परमेश्वराकडे वळलेत असेच आम्ही देखील करावे.

येणे कशाप्रकारे झाले ते स्वत: आमच्या विषयी सांगतात, आणि ही गोष्ट देखील की तुम्ही कशाप्रकारे मूर्त्यांपासून
१० देवाकडे वळलात. यासाठी की जिवंत व सत्य देवाची सेवा करावी **आणि** त्यांच्या पुत्राची स्वर्गातून येण्याची वाट
**२** पाहण्यास, ज्यांना त्यांनी मेलेल्यांतून उठविले अर्थात येशू जो आपल्याला येणाऱ्या क्रोधापासून सोडविल. **हे** बंधूंनों,
२ तुम्हाला स्वत:ला माहित आहे की तुमच्यात आमचे येणे व्यर्थ झाले नाही. **ज्याप्रकारे** तुम्हाला माहित आहे की फिलीप्पैत
दु:ख भोगून व उपद्रव सहन करून देखील परमेश्वराने आम्हाला असे धैर्य दिले की आम्ही परमेश्वराचा शुभसंदेश
३,४ विरोध असतानाहि तुम्हाला दिला. **कारण** आमचा उपदेश भ्रम किंवा अशुद्धतेपासून किंवा छळाचा देखील नव्हता. **परंतु**
परमेश्वराने आम्हाला ज्याप्रकारे योग्य समजून शुभसंदेश सोपवला, आम्ही तसाच तो तुम्हाला दिला आणि याद्वारे
५ मनुष्याला नव्हे तर परमेश्वराला जे आमची अंत:करणे पारखतात त्यांनाच प्रसन्न करतो. **ज्याप्रमाणे** तुम्हांला ठाऊक
आहे की आम्ही खुशामदीने कधीहि बोललो नाही, तसेच लोभा करता बहाणे केले नाहीत. परमेश्वर आमचे साक्षी
६ आहेत. **जरी** आम्ही ख्रिस्तांचे प्रेषित असल्यामुळे आमचे वजन पडण्यासारखे होते तरी आम्ही मनुष्यांच्या आदराची
७ अपेक्षा केली नाही किंवा तुमच्या पासून किंवा दूसऱ्यांपासून देखील नाही. **परंतु** ज्याप्रमाणे आई आपल्या मुलाबाळाचे
८ पालन-पोषण करते, तसेच आम्ही सुद्धा तुमच्यांत राहून कोमलता दाखवली **आणि** तुमच्याबद्दल कळकळ वाटत
असल्यामुळे केवळ परमेश्वराची सुवार्ताच नव्हे तर आपला जीव हि देण्यास तयार होतो. केवळ यासाठी की तुम्ही

---

**''जिवंत व सत्य परमेश्वर''**- पौल या परमेश्वरात व इतर 'ईश्वरांत अंतर दाखवण्यासाठी या शब्दांना वापरतो थेस्सलीकेचे विश्वासू पूर्वी या मूर्त्यांची पूजा करायचे आणि पुष्कळसे लोक त्यावेळी सुद्धा त्यांची पूजा करत होतेत्र्‍ १ करिंथ ८:५,६. स्तोत्र ११५:-८; यशया ४४:२०; यिर्म १०:१४; रोम १:२२,२३,२५.

जर आपली अशी इच्छा आहे की सत्य व जिवंत परमेश्वर आपले सुद्धा परमेश्वर व्हावेत तर आपण देखील थेस्सलनीकाच्या लोकांसारखे करावे. एकाच वेळी सत्य परमेश्वर व मूर्त्यांची उपासना होऊ शकत नाही.

१:१० **''प्रतीक्षा करणे''** - १ करिंथ १:७; तीताला २:१३; इब्री ९:२८. थेस्सलनीकाला लिहिलेल्या दोन्हीं पत्रात **''येशू ख्रिस्ताचे दुसरे आगमन''** हा एक महत्वपूर्ण विजय आहे. हा नवीन कराराचा आवश्यक विषय होय. २:१९,३:१३; ४:१३-१८; २ थेस्स१:७; २:१; मत्तय २४:३०; योहान १४:३; प्रेषित १:११; प्रगटी १:७.

**''मेलेल्यांतून उठविले''**- मत्तय २८:६; प्रेषित १:३; २:२४-३२;१करिंथ १५:३-८.

**''येणारा क्रोध''** - रोम १:१८; २:५; इफि ५:६; कल ३:६; प्रगटी ६:१६. परमेश्वराच्या क्रोधावर नोट्स गणना २५:३; स्तोत्र ९०:७-११; योहान ३:३६; रोम १:१८. जेव्हा परमेश्वर जगाचा न्याय करावयास येतील तेव्हा त्यांचा क्रोध प्रगट होईल. क्रोध, तारणच्या उलट आहे -५:९. याचा अर्थ आहे सार्वकालिक दंड - २ थेस्स १:७-१०; मत्तय २५:४६. विश्वासूंना या क्रोधापासून केवळ येशूच वाचवतात. रोम ५:९ पहा. वचन जाणणाऱ्यांनी या भागा विषयी आपले विचार प्रगट केले आहेत. ते असे की ज्या क्रोधाविषयी तो सांगतो, तो या युगाच्या शेवटी होणारा त्रासाचा काळ होय. (मत्तय २४:२१) बायबल मध्ये महान संकटाच्या काळाला परमेश्वराचा क्रोध असे म्हटले गेले नाही. वास्तविक पाहता हा परमेश्वराच्या लोकांच्या विरोधात सैतान व वाईट मनुष्यांचा क्रोध आहे. मत्तय २४:२९; प्रगटी ६:१२-१७; १३:७,१५:१७. येथे किंवा आणखी कोठेहि पौल असे म्हणत नाही की विश्वासू यातून सोडवले जातील, याठिकाणी आपण समजून घ्यावे की मंडळी महासंकटाच्या काळातून गेली किंवा गेली नाही तरी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे खरे विश्वासू त्या वेळी संकट काळात राहणारच. प्रगटी १२:१७; १३:७ पहा. जर संकट काळ परमेश्वराचा क्रोध आहे तर याचा अर्थ असा आझा की परमेश्वराचा क्रोध त्या संतावर येईल जे मृत्यूपर्यंत ख्रिस्त विरोधीचा सामना करतील आपण या शक्यतेची कल्पना करू शकता काय? निश्चित ''परमेश्वराचा क्रोध'' एका अशा अनुभवाकडे (काळ) संकेत करतो जो महासंकटाच्या काळापेक्षा भयानक आहे.

२:१ **''येणे व्यर्थ''** -१:५-१० या गोष्टीस स्पष्ट करतो.

२:२ **''फिलिप्पै''**- प्रेषित १६:१९-२४.

**''संघर्ष''**-प्रेषित १७:५-१०.

२:३ थेस्सलनीकात कोणीतरी पौलाचा विरोध करत होता. २ करिंथ १:१२; २:१७; ४:२.

२:४ **''शुभवर्तमान सोपवले''**- १ करिंथ ४:१; गल २:७; इफि ३:७,८; १ तीमथ्य १:११,१२.

**''मनुष्यांना नवहे''** - गल १:१०.

**''अंत:करण पारखतात''**-१ शमु १६:७; स्तोत्र, ६६:१०; १३९:१,२३,२४. नीति २१:२; यिर्म १७:१०; प्रगटी २:२३.

२:५ प्रेषित २०:३३-३५; २ करिंथ ७:२. काही प्रचारक धनाच्या लोभात असतात आणि लोकांपासून ते प्राप्त करण्यासाठी लीनतेचे व नम्रतेचे सोंग करतात- १ तीमथ्य ६:५. पौल त्यांच्या सारखा नव्हता. त्याला ठाऊक होते की लोभी व धोका देण्याऱ्यावर परमेश्वराचा क्रोध असतो - इफि ५:५,६; कल ३:५,६; १ तीमथ्य ६:९:११.

**''आणि परमेश्वर देखील''**-वचन १० हे एका जोरदार पद्धतीने एखादी गंभीर बाब सांगणे होय.

२:६ **''मनुष्यांच्या''**-योहान ५:४४; रोम २:२९.

**''ओझे''** -१ करिंथ ९:७-१५; २ करिंथ ११:९.

२:७ वचन ११; गल ४:१९.

२:८ २ करिंथ ७:३; १२:१५; १ योहान ३:१६.

९ आमच्यासाठी बहुमूल्य होतात. हे **बंधूंनो** तुम्ही आमच्या श्रमाची व कष्टांची आठवण ठेवता, की आम्ही यासाठी
रात्रंदिवस परिश्रम करून तुम्हांस परमेश्वराचा शुभसंदेश दिला, यासाठी की तुमच्यापैकी
१० कोणावर देखील आमचा भार होऊ नये. तुम्ही स्वत:च साक्षी आहात. आणि परमेश्वर देखील, की तुम्हां विश्वासणाऱ्यात
११ आम्ही पवित्रतेने,नीतीने व निर्दोषतेने कसे वागलो. **तुम्हाला** माहित आहे की जसा बाप आपल्या मुलांना करतो तसेच
१२ आम्ही तुमच्यातील प्रत्येकाला उपदेश करत, शांति देते, समजवत होतो. **की** जे परमेश्वर
१३ आपल्या राज्यात व गौरवात तुम्हाला बोलावतात त्यांना शोभेल अशी वागणूक ठेवावी. **म्हणून** आम्ही ही परमेश्वराची
निरंतर उपकारस्तुति करतो, की जेव्हा आमच्या द्वारे परमेश्वराची सुवार्ता तुम्ही ऐकली, ती तुम्ही मनुष्यांची नव्हे
१४ तर परमेश्वराचे वचन म्हणून (आणि खरोखर असेच आहे) स्वीकारली. **हे** बंधूनो, तुम्ही परमेश्वराच्या त्या
मंडळयांसारखे जीवन जगू लागतात जी यहूदियांत ख्रिस्त येशूत आहेत, कारण तुम्ही देखील आपल्या लोकांपासून दु:खे
१५ सोसली, जशी त्यांनी यहूदयांच्या पासून प्राप्त केली होती. **ज्यांनी** येशूला आणि संदेष्टांनाहि मारून टाकले आणि
१६ आम्हाला देखील छळले. परमेश्वर त्यांच्यावर प्रसन्न नाहीत, आणि ते सर्व मानसाचेहि विरोधी झाले आहेत. **कारण**
ते परराष्ट्रीयांबरोबर बोलण्यास मनाई करतात, यासाठी की सर्वदा आपल्या पापांचे माप भरत राहावे, परंतु त्यांच्यावर
१७ भयंकर प्रकोप येऊन पोचला आहे. **हे बंधूंनो** आम्ही थोडा वेळ हृदयाने नव्हे तर देहाने तुमच्या पासून वेगळे झालो
१८ होतो, **म्हणून** उत्कंठेने तुमचे पासून वेगळे झालो होतो, म्हणून उत्कंठेने तुमचे तोंड पाहण्याचा आणखी अधिक प्रयत्न
१९ केला. **म्हणून** आम्ही (अर्थात मी पौलाने) एकदा नव्हे तर दोनदा तुमच्याकडे येण्याची इच्छा केली परंतु सैतानाने
आम्हांस अडविले.आमची आश किंवा आनंद किंवा अभिमानाचा मुगूट काय आहे? प्रभु येशू ख्रिस्ताच्या आगमनाच्या
२० वेळी त्यांच्यासमोर तुम्हीच आहात ना ? तुम्ही आमचे गौरव व आनंद आहात.**म्हणून** जेव्हा आम्ही प्रतीक्षा करू
३,२ शकलो नाही, **तेव्हा** आम्ही अथेनैतच एकटे राहण्याचा विचार केला **आणि** आम्ही तीमथ्याला जो ख्रिस्ताच्या सुवार्तेत

---

२:९ प्रेषित १८:३; २ करिंथ ११:९; २ थेस्स ३:८.

२:१० स्वत:साठी या प्रकारच्या गोष्टी तो करत नाही. तो त्यांच्यासाठी व शुभवर्तमानासाठी असे बोलतो. २ करिंथ १:१२; ११:१६-२१; १२:१९. त्यांनी सुवार्तेच्या सत्यते विषयी कोणताच संदेह करू नये, असे त्याला वाटते.

२:११,१२ तो त्यांच्यासाठी आई-वडिलांसारख होता. वचन ७. १करिंथ ४:१५; आणि गलती ४:१९ शी तुलना करा. सुवार्ता देणाऱ्यांचा आणि पाळकांचा व्यवहार विश्वासूंशी कसा असावा याचा तो आदर्श होतो.

**"वागणूक"**-इफि २:१० चे नोट्स पहा.

**"परमेश्वरास योग्य"** - इफि ४:१; फिली १:१७; कलस्से १:१० पहा.

**"बोलवतात"** - रोम १:६; ८:३०.

**"राज्य आणि गौरव"** - मत्तय ४:१७; २५::३४; योहान १७:२२,२८; रोम ५:२; ८:१७; १४:१७. कलस्सै १:१२,१३; इब्री १२:२८; २ पेत्र १:११.

२:१३ **"परमेश्वराचा शुभसंदेश"**-इथे याचा अर्थ आहे, ख्रिस्ताचा शुभसंदेश, गल १:११,१२; आणि २ तीमथ्य ३:१६ शी तुलना करा.

**"प्रभावशाली आहे"**-फिली १:६;२:१३ शी तुलना करा. चांगुलपणकरता, परमेश्वराचे लोकांच्या अंत:करणात आणि हृदयात कार्य कारणारे बळ आहे. स्तोत्र ११९:११; इब्री ४:१२. म्हणून आपल्याला कलस्सै ३:१६ द्वारे परमेश्वराचा निर्देष मिळाला आहे.

२:१४ **"जीवन जगू लागलात"** -१:६.

**"तुम्ही देखील आपल्या लोकांशी"**-ग्रीक विश्वास न करणाऱ्या ग्रीक लोकांनी, विश्वास करणाऱ्या ग्रीक लोकांना छळले, जसे अविश्वासू यहूदयांनी विश्वासू यहूदयांना छळले होते. त्याच प्रकारे लोक या पृथ्वीवर ख्रिस्ती लोकांना छळत आहेत.

२:१५ **"मारून टाकले"**-यहूदयांनी येशूला रोमी लोकांच्या हातात दिले आणि त्यांच्या मृत्यूची मागणी केली होती वास्तविक पाहता, रोमि शिपायांनी त्यांना मारल होते. यहूदी लोक त्यांच्या मृत्यूस जबाबदार होते. (मत्तय २७:१,२,२२,२५; प्रेषित २:२३; ३:१३.)

**"संदेष्टयांना"** - मत्तय २३:३७; प्रेषित ७:४२.

**"आम्हाला छळले"** - प्रेषित १३:४५,५०; १४:२,५:१९;१७:७ इ.

२:१६ **"परराष्ट्रीय"**- प्रेषित १३:४५,५०; २०:३; २१:२७; २२:२१,२२.

२:१७,१८ **"वेगळे झालोत"**- प्रेषित १७:१० केवळ थोडा वेळ तो थेस्सलनीकेत होता. काहीहि शिकवण्याची संधि मिळण्यापूर्वी त्याला विश्वासूंना सोडावे लागले. तो त्यांच्यावर खूप प्रेम करत होता (७,११) आणि त्यांना भेटण्याची त्याची इच्छा होती.

**"सैतानाने अडविले"**- रोम १:१३ शी तुलना करा. आपल्याला माहित नाही की पौल कोणत्या परिस्थितिकडे संकेत करतोय, आपल्याला ज्ञात आहे की सैतान निरंतर परमेश्वराच्या सेवकांचा विरोध करत असतो. असे देखील वाटते की तो योजना भंग किंवा कामात उशीर करण्याचे कार्य सुद्धा करू शकतो. सैतानविषयी इति २१:१; मत्तय ४:१-१० आणि योहान ८:४४ चे नोट्स पहा.

२:१९,२० -फिल ४:१ पहा. ज्यांनी ख्रिस्तावर विश्वास ठेवला त्यांच्याबद्दल तो अभिमान करत होता. यात त्याला किती आनंद मिळत असेल.

**"मुगुट"**-तो आत्म्यांना जिंकण्याच्या प्रति फळाविषयी सांगतो. याचा अर्थ स्वप्रयत्नाने लोकांना ख्रिस्ताच्या उपस्थितित पाहणे होय. स्तोत्र १२६:१; ५:६; योहान ४:३६.

३:१ **"अथेनै"**-पौल आणि त्याचे सोबती थेस्सलनीका ते बिरूयास आणि तेथून अथेनैस गेले (प्रेषित १७:१०,१५).

३:२ **"तीमथ्य"**-१:१; प्रेषित १६:१.

आमचा भाऊ आणि परमेश्वराचा दास आहे यासाठी पाठविले की त्याने तुम्हाला स्थिर करावे, आणि तुमच्या विश्वासा
३ विषयी तुम्हांला समजवावे, यासाठी **की** कोणीहि या संकटात घाबरून जाऊ नये, कारण तुम्हांस माहित आहे की आम्ही
४ या करताचा नेमलेले आहोत. **कारण** पूर्वी देखील जेव्हा आम्ही तुमच्याजवळ होतो तेव्हा सांगत होतो की, आपल्याला
५ संकटे भोगावी लागतील, आणि असे झाले देखील, आणि तुम्हाला हे कळले आहे. **यास्तव** जेव्हा मला राहवले नाही तेव्हा
तुमच्या विश्वासाची विचारपूस करण्यासाठी पाठविले की परीक्षा घेणाऱ्यांनी परीक्षा घेतली असल्यास कोण जाणे आमचे
६ परिश्रम व्यर्थ गेले असावेत. परंतु **आता** तीमथ्याने तुमच्यापासून आम्हांकडे येऊन तुमच्या विश्वासाचा आणि प्रेमाचा
संदेश सांगितला आणि हे सुद्धा की जसे प्रेमाने तुम्ही नेहमी आमची आठवण करता आणि पाहण्याची इच्छा ठेवता,
७ तसेच आम्ही देखल तुम्हाला भेटावयास उत्कंठित आहोत **म्हणून** बंधूनो, आम्हांला आपल्या सर्व कष्टांत आणि संकटात
८,९ तुमच्या विश्वासामुळे शांति मिळाली.**आता** जर तुम्ही प्रभुत स्थिर आहात तर आम्ही जिवंत आहोत. **जसा** आनंद तुमच्या
प्रति आम्हाला परमेश्वरासमोर आहे. त्याच्या मोबदल्यात आम्ही तुमच्या विषयी परमेश्वराचे आभार कसे मानावे ?
१०,११ **आम्ही** रात्रंदिवस पुष्कळ प्रार्थना करतो की तुमचे तोंड पहावे आणि तुमच्या विश्वासातील उणीव पूर्ण करावी. **आता**
१२ प्रभु येशूने तुम्हांकडे येण्याबद्दल आमचे मार्गदर्शन करावे. **आणि** असे करावे की आम्ही तुमच्यावर प्रेम करतो तसेच
१३ तुमचे प्रेम आपसांत आणि सर्व मनुष्यांत वाढून विपुल व्हावे. **जेव्हा** आपले प्रभु येशू आपल्या सर्व पवित्र लोकांसोबत

---

**''स्थिर करावे''**-तो नेहमी त्यांच्या विषयी चिंतित असायचा; यासाठी की ख्रिस्ताच्या नव्या विश्वासूंनी आपल्या विश्वासात मजबूत व्हावेत आणि ख्रिस्तासाठी जगण्याकरता प्रोत्साहित केले जावेत. वचन १३; २:२ थेस्स २:१६; प्रेषित १४:२२; २ करिंथ १२:१९; इफि ३:१६; कल १:११; २:७.

३:३ **''या क्लेशांत''**-२:१४.

**''आपण यासाठी नेमले गेलो आहोत''**- या सत्यावर काळजीपूर्वक लक्ष दया आणि योहान १६:३३, प्रेषित १४:२२; १ पेत्र १,१२ शी तुलना करा.

३:४ आपले अनुभव आणि वचनाच्या आधारे त्याने शिकवले की काय होईल. सुवार्तेच्या आशीर्वाद विषयी सांगताना त्याने विश्वासूंना येणाऱ्या समस्यांविषयी अजाण ठेवले नव्हते. प्रेषित २०:२०,२७ शी तुलना करा.

३:५ **''आणि राहवले नाही''** - १ करिंथ १५:२; गल ४:११ शी तुलना करा. ख्रिस्तातील खरा विश्वास, विश्वासूंना परीक्षेत, पारखले जाण्यात आणि छळात जयवंत होण्यासाठी मदत करतो. (योहान १०:३९; १ योहान ५:४-५ इ.) पौलाला कळत होते की थेस्सलनीकाचे लोक अनेक प्रकारच्या समस्या सोशीत होते. त्यांच्या विश्वासाची परीक्षा घेतल्यास ते खरे निघतील काय ? याबद्दल जाणून घेण्याची त्याची इच्छा होती.

**''परीक्षा घेणार''** - सैतान (मत्तय ४:१-१०)

**''व्यर्थ''** - गलती २:२; फिली २:१६. ''विश्वास व प्रेम''-१:३.

३:६,७ **''विश्वासामुळे तुमच्याविषयी शांति मिळाली''**-त्याला माहित झाले की विश्वासाच्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले होते; आणि म्हणून त्यांनी सिद्ध केले की तो खरा विश्वास होता (१पेत्र १:६,७).

३:८ **''आम्ही जिवंत आहोत''**-पौलाला वाटत होते की त्याचे जीवन त्यांच्यांशी बांधलेले आहे. जर ते ख्रिस्तात विश्वास योग्यतेने त्याच्यासोबत जिवंत होते तर तो स्वत:ला जिवंत समजतो. १ करिंथ १२:२४-२६ शी तुलना करा.

**''स्थिर रहावे''**- १ करिंथ १५:५८; गल ५:१; इफि ६:१४; कल २:५; याकोब ५:८; १ पेत्र ५:९,१०; इफि ३:८.

३:९ **''उपकारस्तुति''**- १:२ त्याच्या सेवेमुळे ते थेस्सलनीकेचे विश्वासू शिष्य बनले होते. परमेश्वरा प्रति तो कृतज्ञ होता कारण त्याला माहित होते की केवळ परमेश्वरालाच हे शक्य आहे.

**''आनंद''** - २:१९,२० यासाठी की त्यांनी स्वत:ला ख्रिस्ताठायी बळवंत व खरे विश्वासू प्रदर्शित केले. हा आनंद त्याला मिळाला. एका पित्याला मिळणारा हा आनंद होता जो आपल्या मुलांच्या यशस्वीतेते आनंदी होतो. इतर दुसऱ्या आनंदापेक्षा हा आनंदमोठा होतो कारण परमेश्वराच्या सहभागितेतील हा आत्मिक आनंद होता.

३:१० **''प्रार्थना करत असतो''**-१:२,३.

**''तुमच्या विश्वासातील उणीव पूर्ण करावी''**-त्यांनी ख्रिस्तावर विश्वास ठेवला होता व दु:ख भोगून देखील ते स्थिर राहिलेत. पौल असे दाखवत नाही त्यांचा विश्वास परिपक्व आणि सिद्ध होता, त्यांना विश्वासात उन्नति करण्याची आवश्यकता होती. लूक १७:१५; २ करिंथ १०:१५; २ थेस्स १:३. त्यासाठी परमेश्वराच्या वचनातून त्यांना आणखी शिकायचे होते रोम १०:१७; इफि ४:१२-१५. पौल त्यांना भेटून शिक्षण देण्याच्या बेतात होता.

३:११ **''तुमच्याकडे येण्याचे मार्गदर्शन करावे''**- २:१८ शी तुलना करा.

३:१२ ''तुमचा-उन्नति करत जावे''-४:९,१०; २ थेस्स १:३; योहान १३:३४; रोम १२:९,१०; १ करिंथ १३:१,१३; रोम १२:९,१०; १ योहान २:५,१०; ३:११,१४,१६-१८.

३:१३ **''अंत:करण असे स्थिर करावे''**-आत्मिक बळ ही विश्वासू एक मोठी आवश्यकता आहे. परमेश्वराच्या इच्छेत पौलाने प्रार्थना केली की त्यांनी हे बळ प्राप्त करावे.

४ येतील त्यावेळी त्यांनी तुमची हृदये परमेश्वर आमचे बाप, यांच्यासमोर पवित्रते निर्दोष ठरवावीत. **शेवटी** बंधूनो, आम्ही
तुम्हांला विनवतो आणि प्रभु येशूत समजवतो की जसे तुम्ही आमच्यापासून खरे जीवन जगणे आणि परमेश्वराला
२ प्रसन्न करणे शिकलात आणि ज्याप्रमाणे तुमचे जीवन देखील आहे, तशीच तुमची उत्तरोत्तर वाढ व्हावी. **कारण** तुम्हाला
३ ठाऊक आहे की प्रभु येशू कडून तुम्हाला कोण कोणत्या आज्ञा दिल्या: **कारण** तुम्ही पवित्र व्हावे, आणि व्यभिचारापासून
४ स्वत:ला दूर ठेवावे अशी परमेश्वराची इच्छा आहे. **यासाठी** की तुमच्यापैकी प्रत्येकाने पवित्रतेने व आदराने आपल्या
५ देहावर ताबा ठेवावा, **आणि** हे काम अभिलाषेने करू नये किंवा परराष्ट्रीयांसारखे नव्हे जे परमेश्वराला ओळखत
नाहीत. कोणीहि आपल्या भावास ठगवू नये आणि त्याच्या विरूद्ध अपराध करू नये कारण प्रभु या सर्व गोष्टीत तुमचे
७ शासन करतील, जसे आम्ही आधीच तुम्हांला सांगितले व सावध केले होते. **कारण** परमेश्वराने आपल्याला अशुद्धतेसाठी
८ नव्हे तर पवित्रतेसाठी पाचारण केले आहे. **यास्तव** जो या गोष्टींना तुच्छ जाणतो, तो मनुष्यांना नव्हे तर ज्यांनी
९ आपला पवित्र आत्मा तुम्हाला दिला आहे त्या परमेश्वरांना तुच्छ जाणतो. **परंतु** बंधुप्रेमाबद्दल मी तुम्हाला काही
१० लिहावे हे आवश्यक नाही, कारण एकमेकांवर प्रेम करावे हे तुम्हाला परमेश्वराने शिकवले आहे. **कारण** तुम्ही सबंध
मासेदोनियातील भाऊ बहिणींशी तसे वागतच आहात. परंतु हे बंधु:भगिनींनो आम्ही तुम्हाला शिकवतो की यात
११ उत्तरोत्तर वाढ करत जा. **आणि** जशी आम्ही तुम्हाला आज्ञा केली त्याचप्रमाणे चुपचाप राहण्यात आणि आपले स्वत:चे
१२ कार्य करण्यात तत्पर असा; आपल्या हातांनी आपला व्यवसाय करावा यासाठी की बाहेरच्या लोकांबरोबर सभ्यतेने

---

**''पवित्रतेत निर्दोष''** - ५:२३; १ करिंथ १:८; इफि ५:२६,२७; फिली २:१५; तीताला २:१४; २ पेत्र ३:१४.
''पवित्र लोकांनो'' याचा अर्थ देवदूत किंवा विश्वासू किंवा दोन्ही देखील होऊ शकतो. (४:१४; मत्तय २५:३१; यहूदा १४; प्रगटी १९:१४)

४:१ **''परमेश्वराला प्रसन्न करणे''**-रोम १४:१८; करिंथ ५:९; इफि ५:१०; कल १:१० यापेक्षा दुसऱ्या प्रकारचे जीवन विश्वासूने जगू नये. आपली पूर्ण जबाबदारी हीच आहे की आपण परमेश्वराला प्रसन्न करावे. प्रत्येक गोष्टीत स्वत:ला विचारावे, ''काय ही गोष्ट खरोखर परमेश्वराला प्रसन्न करते? तेव्हा आपण दाविदासारखे जो परमेश्वराच्या हृदयानुसार होता, बनू शकू. १ शमु १३:१४ चे नोट्स पहा.

४:२ **''प्रभु येशूत''** - त्याला माहित होते की तो ख्रिस्ताचा राजूदत आहे. (२ करिंथ ५:२०) शुभसंदेश आणि शिक्षण, जो तो मंडळयांना देत होता, येशू कडूनच त्याने प्राप्त केले होते. म्हणून स्वार्गच्या अधिकारासह तो बोलू शकत होता.

४:३ **''तुम्ही पवित्र बना''** - ३:१३; ५:२३; योहान १७:१७-१९; रोम ६:१९; २ करिंथ ७:१; इब्री १२:१४; १ पेत्र १:१५,१६.
**''अनैतिकता''**- १करिंथ ६:१८-२०; गल ५:१९; इफि ५:३; कल ३:५.

४:४,५ **''शरीर''**-कोणत्याहि व्यक्तिचे शरीर/देह त्याच्या आत्म्याचे पात्र आहे आणि आत्म्यांने त्याचे गुलाम न बनता, आत्म्याचे त्याच्यावर नियंत्रण असावे.
**''आदराने''**-अनैतिकता अनादर आणते आणि लज्जास्पद असते. ''त्या परराष्ट्रीयांसारखे अनैतिक जीवन जे येशूला ओळखत नाहीत''- इफि ४:१७-२०.

४:६ व्यभिचार एक असा अपराध आहे जो करणाऱ्याशी नव्हे तर वैवाहिक सोबत्याशी संबंधित असतो.
**''प्रभु सर्व गोष्टीत शासन करतील''**-रोम १२:१९ परमेश्वर निश्चित समयी दंड आणतील. इफि ५:५,६;कल ३:६; इब्री १३:४. विश्वासूंनी सूड घेण्याची संधि शोधू नये किंवा असे करू देखील नये.

४:७ **''पवित्रतेसाठी पाचारण केले आहे''** - रोम १:७; १ करिंथ १:२; तीताला २:१४; इब्री ३:१; १२:१४; १ पेत्र १:१.

४:८ **''मनुष्यास नव्हे तर परमेश्वरास तुच्छ जाणतो''**-पौलाची शिक्षण'' येशू ख्रिस्ताद्वारे होते. (वचन २). म्हणून त्याच्या शिक्षणाला तुच्छ जाणण्याचा अर्थ होता ज्याने त्याला पाठवले त्या परमेश्वराचा अव्हेर करणे.
**''पवित्रआत्मा''** - १ करिंथ ६:१९; गल ४:६; इफि १:१३;योहान १४:१६,१७.

४:९ **''बंधुप्रेम''**-ते प्रेम जे एकमेकांसाठी आहे. एका आत्मिक बापाचे ते आत्मिक भाऊ बहिण आहेत. या सत्याच्या आधारे त्यांनी व्यवहार करावा. योहान १३:१४ इ.
**''परमेश्वरापासून शिकलेत''**-यश ५४:१३; योहान ६:४५, १ योहान २:२६ शी तुलना करा. स्तोत्र २५:४,५ पहा.

४:१० **''मासेदोनिया''** -प्रेषित १६:९ त्या राज्यात थेस्सलनीका होते.
**''वाढत जा''**८ -३:१२; ४:१ जो पर्यंत इफि ४:१२-१५ एक वास्तविकता होत नाही तो पर्यंत ख्रिस्ती जीवन निंरतर वाढत जाणारे जीवन असावे.

४:११ **''प्रयत्न''**- लोकांच्या अपेक्षा खूप असतात. काही स्वार्थी असतात. (गल ५:२०; फिली १:७; याकोब ३:१४). पौल आपल्याला एक लक्ष्य दाखवतो जे योग्य आहे. परमेश्वराने स्वत:च्या इच्छेनुसार प्रत्येक कार्य करण्यासाठी आपल्याला योग्य ठिकाणी ठेवले आहे. दुसऱ्यांच्या कार्यात दखल न देता आपण शांतिने आपलेच कार्य करत रहावे.
**''आपल्या हातांनी आपला व्यवसाय करा''** आजदेखील पुष्कळ लोक असाच विचार करतात जसे त्याकाळी करायचे. त्यांचा विचार होता की शारीरिक श्रम करणे फार छोटे काय आहे. महान प्रेषित असा विचार करत नव्हता (२:९; प्रेषित १८:३; २०:३४,३५).दूसऱ्यांनी देखील असा विचार करू नये असे पौलाला वाटायचे.

४:१२ **''तुम्हाला कशाचीहि गरज पडू नये''** - आळस केल्याने किंवा दुसऱ्यांच्या कामात हात घातल्याने काहीच फायदा नाही. नीति २४:२९-३४.

१३ वागावे आणि तुम्हांस कशाचीहि गरज पडू नये. **हे बंधूनो** झोपी गेलेल्या लोकांसारखे अजाण नसावे, असे आम्हास
१४ वाटते आणि त्या लोकांसारखे ज्यांना आशा नाही शोक करत राहू नये; **कारण** जर आपण विश्वास करतो की येशू मेलेत,
१५ पून्हा जिवंत झालेत, त्याचप्रमाणे परमेश्वर त्यांनादेखील जे येशूत झोपलेले आहेत, आपल्या सोबत घेऊन येतील. **आम्ही**
प्रभुवचनानुसार तुम्हाला सागतो की जे जिवंत आहेत आणि प्रभुच्या आगमनापर्यंत आपण जे उरूं, झोपलेल्यांच्या पुढे
१६ कधी जाणारच नाही. **कारण** प्रभु स्वत: स्वर्गातून उतरतील, त्यावेळी आज्ञाध्वनी आणि प्रधान दूताचा शब्द ऐकू येईल
१७ आणि परमेश्वराच्या तुतारीचा नाद होईल. व जे ख्रिस्तामध्ये मेलेले आहेत, ते प्रथम जिवंत होतील. **नंतर** आपण जे
उरलेले आहोत, त्यांच्या सोबत मेघांवर घेतले जाऊ यासाठी की अंतराळात किंवा हवेत प्रभुशी समेट होऊन याप्रकारे
१८,**५** आपण सदा सर्वदा प्रभु जवळ राहू. **या** गोष्टींनी एकमेकांना शांति देत जा. **हे बंधूनो** काळ व समय ह्याविषयी तुम्हाला
२ काही लिहिण्याची गरज नाही. **कारण** तुम्हाला खांत्री आहे की जसा चोर रात्री येतो तसाच प्रभुचा दिवस येणार आहे.

---

४:१३-१८ येशू ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनाबद्दलची भविष्यवाणी मत्तय २४:२७-३१,२६; योहान १४:३; प्रेषित १:११; १ करिंथ १५:२३ (५१-५४); २ थेस्स १:७; २:१:१-८; १ योहान २:२८; प्रगटी १:७; १९:११-१६; २२:१२.

४:१३ "जे झोपलेले आहेत'' हा भाव सामान्यत: बायबल मध्ये मृत्युकडे संकेत करतो. योहान ११:११,१४. प्रेषित ७:६०. "झोपणे'' दर्शविते की जागे होण्याची एक वेळ किंवा पुनरूत्थान येणार आहे. या "झोपणे'' यात केवळ शरीर झोपते, आत्मा नव्हे. पहा प्रगटी ६:९-११.

"दुसऱ्यांसारखे शोक करत राहू नये'' - विश्वासूंना माहित आहे की मृत्यू अंत नाही. पुनरूत्थान आहे आणि पूर्वीपासून जे आधी गेलेले आहेत त्यांच्याशी मिलन देखील "आशा नाही'' - ख्रिस्ताशिवाय भविष्यात कोणतीच आशा नाही (इफि २:१२).

४:१४ "झोपलेले आहेत, त्यांना आपल्या सोबत घेऊन जातील मत्तय २७:५०; ८:६; प्रेषित १:३; रोम १:४; १करिंथ १५:३-८.
"तसेच'' जे परमेश्वराने प्रगट केले आहे त्यांवर तसेच दूसऱ्या गोष्टींना सुद्धा विश्वास करण्या योग्य आपण व्हावे.
"तसेच'' - जे परमेश्वराने प्रगट केले आहे त्यांवर, तसेच दुसऱ्या गोष्टींना सुद्धा विश्वास करण्या योग्य आपण व्हावे.
"येशूत झोपलेले आहेत''- आल्यावर येशू त्या विश्वासूंचे आत्मे घेऊन जातील जे मेलेले आहेत.

४:१५ "प्रभुचे वचन'' - हे शक्य आहे की येशूंनी जे रहस्य प्रगट केले ते हे की जे येशूत मेलेले आहेत,ते प्रथम जिवंत होतील पौलाला ज्याप्रमाणे दुसऱ्या सत्यांचे प्रकाशन दिले होते त्याचप्रकारे हे रहस्य देखील त्यावर प्रगट केले. गल १:११-१२. जरी कोणत्याच शुभवर्तमानात याबद्दल उल्लेख नाही. तर ते शक्य आहे की पृथ्वीवर असतांना येशूंनी आपल्या प्रेषितांवर हे प्रगट केले.

**"आपण जे जिवंत आहोत''** - ख्रिस्त परत आल्यावर काही लोक जिवंत होतील. "आपण'' या शब्दाचा अर्थ असा नव्हे की पौल स्वत:ला देखील त्यात मोजतो; सामान्यत: तो असे म्हणत आहे. ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनाच्या वेळी काही विश्वासू मेलेले व काही जिवंत असणार. जसे आपण सांगू शकत नाही तसेच पौल देखील ख्रिस्ताच्या आगमनाविषयी जाणत नव्हता. ५:१,२; मत्तय २४:३६ म्हणून तो विचार करू शकत नव्हता की तो जिवंत राहणार नाही. (२ तीमथ्य ४:६,७). येथे तो असा कोणताच इशारा करत नाही की येशूचे आगमन महासंकटाच्या आधी होईल; (मत्तय २४:२१) किंवा नंतर.

**"पुढे जाणार नाही''** - जे आताहि जिवंत आहेत.

४:१६ **"स्वर्गातून''**-प्रेषित १:११; ३:२१; प्रगटी १९:११. "आज्ञाध्वनि'' या ग्रीक शब्दाचा अर्थ आहे "बोलवणे'' किंवा "जोराने आज्ञा देणे'' -विश्वासू कबरेत असो किंवा इतर कोठेहि, येशू त्यांना बोलवतील-पहा योहान ५:२८; योहान ११:४३,४४ शी तुलना करा.

**"प्रधान देवदूत''** - मीखाएल (यहूदा ९; दानिएल १०:१३) केवळ मीखाएलच नव्हे तर इतर दुसरे देवदूत सुद्धा ख्रिस्ताबारोबर येतील. मत्तय १६:२७; २५:३१.

**"तुतारी''**-१ कुरिंथ १५:५२; मत्तय २४:३१ पहा.

**"जे ख्रिस्तात मेलेले आहेत''**-त्याचवेळी अविश्वासूंच्या जिवंत होण्याबद्दल पौल काही देखील सांगत नाही. प्रगटी २०:४-६. फिली३:११ शी तुलना करा.

४:१७ **"मेघांवर घेतले जातील''**-त्या क्षणी काय होईल हे पौल १ करिंथ १५:५२, ५३ मध्ये सांगतो. फिली ३:२०,२१ सुद्धा पहा. १ योहान ३:२. सामान्यत: विश्वासू "रैप्चर'' (जो एक लॅटिन शब्द आहे, ज्याचा अर्थ "घेतले जाणे'') विषयी सांगतात.

**"मेघ''** - दानि ७:१३; मत्तय २४:३०; २६:६४; प्रगटी १:७ **"हवेत प्रभुशी भेट''** मत्तय २४:३१ शी तुलना करा. येथे पौल सांगत नाही की यानंतर काय होईल ? ते ताबडतोब आपल्या लोकांसोबत परत येणार की नाही. "सर्वदा प्रभु सोबत'' हे एक अद्भुत लक्ष्य आहे, ज्याकेड प्रत्येक विश्वासू चालत जात आहे. ५:१०; योहान १४:३; कल ३:४; प्रगटी २१:३ इ.

"शांति'' किंवा "प्रोत्साहन''ग्रीक भाषेच्या शब्दात दोन्दी अर्थ लावले. जातात. परमेश्वराच्या लोकांवर जे प्रत्येक दु:ख येण्याची शक्यता आहे त्यावेळी हे शब्द किती शांति व प्रोत्साहन देतात. ही दु:खे म्हणजे अनेक प्रकारची निराशा, पारखले जाणे, छळ किंवा संकटे आहेत.

४:१८ **"शांति''**किंवा **"प्रोत्साहन''**ग्रीक भाषेच्या शब्दात दोन्ही अर्थ लावले जातात परमेश्वराच्या लोकांवर जे प्रत्येक दु:ख येण्याची शक्यता आहे त्यावेळी हे शब्द किती शांति व प्रोत्साहन देतात. ही दु:खे म्हणजे अनेक प्रकारची निराशा, पारखले जाणे, छळ किंवा संकटे आहेत.

५:१ **"समय व काळ''** - मत्तय २४:३६; प्रेषित १:६,७.

५:२ **"प्रभुचा दिवस''** - प्रेषित २:२०; १ करिंथ ५:५; २थेस्स २:२; २ पेत्र ३:१०. हे शब्द जुण्या करारातून घेतले गेले आहेत. यश १३:६,९(२:१२-१८) योएल १:१५; २:३१. महासंकटाचा काळ जो प्रभुच्या दिवसा आधी येणार, यापेक्षा भिन्न आहे. मत्त २४:२९ आणि प्रगटी ६:१२-१७ पहा व तुलना करा. ४:१३-१८ यात पौलाने पुनरूत्थान व घेतले जाणे याबद्दल लिहिले आहे. येथे तो

३ **जेव्हा** लोक कुशल, निर्भय आहे असे म्हणतील तेव्हा ज्याप्रमाणे गरोदर स्त्रीला अचानक प्रसव वेदना होतात
४ त्याचप्रमाणे त्यांच्यावर विनाश येऊन पडेल, आणि ते कोणत्याहि प्रकारे वाचू शकणार नाही, परंतु **हे बंधूनो,** तुम्ही
५ अज्ञानात आणि वाईटात नाही, की तो दिवस चोरासारखा येऊन ठेपावा. **कारण** तुम्ही प्रकाशाची मुले आणि दिवसाची
६ प्रजा आहात आपण रात्रीचे व अंधाराचे नाही. **म्हणून** इतरांसारखे झोपत राहू नका तर जागे राहून सावध असा
७,८ **कारण** झोपणारे, रात्रीच झोपतात आणि जे झिंगणारे ते रात्रीच झिंगतात. **परंतु** आपण जे दिवसाचे आहोत विश्वास व
९ प्रेमाची झिलम घालून आणि तारणाच्या आशेचे टोप घालून सावध असावे. **कारण** परमेश्वराने आपल्याला दंड देण्यासाठी
१० नव्हे परंतु यासाठी नेमले आहे की प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे आपले तारण व्हावे. **ते** आपल्यासाठी मरण पावले हयाकरता
११ की आपण जागे असलो अथवा झोपत असलो तरी त्यांच्याबरोबर जिवंत रहावे. **यास्तव** एकदुसऱ्याला शांतिद्या,
१२ एकमेकांची उन्नति करा. जसे तुम्ही करतच आहा. **हे बंधूंनो** आम्ही तुम्हाला विनंती करतो की तुमच्यासाठी जे

---

या गोष्टीचा संकेत करतो की जेव्हा तो त्यांना त्या घटनेविषयी लिहित होता, तेव्हा ''प्रभुच्या दिवसा'' विषयी सांगत होता. असे वाटते की तो असे शिक्षण देत होता की ख्रिस्ताचे परत येणे त्या वेळेच्या प्रारंभी होणार ज्याला प्रभुचा दिवस म्हटले गेले आहे.

**''रात्री चोर''** - मत्तय २४:४३,४४; लूक १२:३९,४०; प्रगटी ३:३; १६:१५.

५:३ **''शांति''** - यिर्म ६:१४; यहे १३:१० शी तुलना करा.

**''अचानक''** नीति ६:१५; २९:१; यशा २९:५६ शी तुलना करा.

**''विनाश''**-फिली ३:१९; २ पेत्र ३:७; २ थेस्स १:८,९ प्रगट करते की या विनाशचा अर्थ काय आहे. प्रभुच्या उपस्थितितून सर्वदा काढून टाकले जाणे.

**''गरोदर व वेदना''**-अचानक येते. याच प्रकारे प्रभुच्या दिवसाला येणारा विनाश म्हटले गेले आहे.

५:४ असे वाटते की पौल शिक्षण देत आहे की, ख्रिस्ताचे विश्वासू, जो पर्यंत प्रभुच्या दिवसाचा प्रारंभ होत नाही, तो पर्यंत पृथ्वी वर राहतील. जर त्याला विश्वास नव्हता की काही लोक येथे राहतील तर तो येशूच्या आगमना विषयी आश्चर्य चकित न होण्याची गोष्ट का करतो ? जर त्याला विश्वास होता की त्यावेळी कोणी राहणार नाही तर, तसे सांगण्याची ही चांगली संधि होती, या ऐवजी की त्यांना ''जागे असा''(वचन ६) असे सांगितले जावे.

**''अंधारात नाही''**-प्रेषित २६:१८; २ करिंथ ४:६; कलस्सै १:१३.

**''येऊन पडेल किंवा गाठेल''**-जे लोक चोराची वाट पाहतात, ते त्यावेळी आश्चर्यचकित होत नाहीत जेव्हा तो येतो. विश्वासू प्रकाशात आहे आणि स्वर्गातून परमेश्वरांच्या पुत्राच्या प्रगट होण्याची प्रतीक्षा करत आहेत-तीताला २:१३. जर असेच आहे तर ही घटना घडल्यावर ते आश्चर्यचकित होऊ शकत नाहीत. लोकांनी दिनांक सांगण्याचा प्रयत्न करू नये. बायबल त्यांच्या येण्याबद्दल आणि युगाच्या शेवटाविषयी कांही चिन्हांचे वर्णन करते. यासाठी की विश्वासूंनी ते येतांना पहावे. (इब्री १०:२५; २ थेस्स ३,४; प्रेषित २:२०; मत्तय २४:२९,३३).

५:५ **''प्रकाशाची मुले''** - इफि ५:८; योहान १२:३६; मत्तय ५:१४.

५:६ **''झोपत नसावे''** - झोपणाऱ्या लोकांना माहित नसते की काय होत आहे किंवा काय होईल.

**''जागत''**-मत्तय २४:४२,४३; २५:१३.

**''सावधा असा''**-ग्रीक शब्दाचा अर्थ ''आत्म संयम'' देखील होऊ शकतो - प्रेषित २४:२५; गल ५:२३; १ पेत्र ४:७; ५:८, २ पेत्र १:६.

५:७ रोम १३:१३,१४; २ पेत्र २:१३.

५:८ **''आपण जे दिवसाचे आहोत''**-वचन . विश्वासू त्या नवीन दिवसाचे आहेत जो ख्रिस्ताच्या आल्यावर येईल. २ पेत्र १:१९; प्रगटी २२:१६. ते आधीपासूनच दिवसाच्या प्रकाशात चालतात.

**''झिलम''**-इफि ६:१४ च्या झिलमेशी तुलना करा. जेथे याला धार्मिक म्हटले गेले आहे. सर्व ख्रिस्तीगुण आपल्यात जुळलेले आहेत.

**''ख्रिस्ताला''**-पांघरल्यावर सर्व काही घातल्यासारखे होते. रोम १३:१४ आणि इफि ४:२४, ६:१३ चे नोट्स पहा.

**''टोप''**-इफि ६:१७ पहा.

५:९ **''क्रोध''**- १:१० चे नोट्स पहा. ''क्रोध'' ''तारणा'' च्या अगदी उलट आहे. (हि महासंकटाच्या काळापासून वाचणे नव्हे) एकाचा अर्थ आहे पाप आणि पाप्यांवरील परमेश्वराचा क्रोध, दुसऱ्याचा अर्थ आहे पापांपासून स्वतंत्रता. म्हणून पापांमुळे येणाऱ्या परमेश्वराच्या क्रोधापासून सुटणे असा आशय आहे.

५:१० **''आमच्यासाठी या कारणामुळे मेलेत''** - योहान १०:१५; रोम ५:८; १ पेत्र ३:१८ येथे जागणे व झोपणे याचा अर्थ जिवंत राहणे किंवा मरणे (३:१३)

**''सर्व मिळून त्यांच्या सोबत जगावे''** जिवंत विश्वासू, ख्रिस्ताच्या जीवनाचा भागीदार आहे; आणि त्या सोबत सहभागिता देखील करतात. (रोम ६:५-८; १ योहान १:३३). जे विश्वासू स्वर्गापर्यंत पोचलेत ते त्यांच्या उपस्थितित आहेत - २ करिंथ ५:८; फिली १:२३.

**''एकमेकांची उन्नति''**-रोम १४:१९; १५:२; १ करिंथ १४:३-५,१२,१७,२६; इफि ४:२९.

५:११ ''शांति'' -४:१८- प्रत्येक विश्वासूचे कर्तव्य व आशीर्वाद होय.

५:१२,१३ **''तुमचे पुढारी आहेत''** - १ तीमथ्य ५:१७; इब्री १३:१७; १ पेत्र ५:१-३.

१३ परिश्रम करतात, प्रभुमध्ये जे तुमचे पुढारी आहेत आणि जे तुम्हाला शिक्षण देतात,. त्यांची आज्ञा पाळावी. **त्यांच्या**
१४ कामामुळे त्यांना प्रेमाने अत्यंत मान देत आपसात शांतिने रहा. **हे भावांनो,** आम्ही तुम्हाला समजवतो की जे व्यवस्थित
नाहीत त्यांना ताकीद दया, जे भितात त्यांना हिंमत दया, जे अशक्त आहेत त्यांना आधार दया, सर्वांबरोबर
१५ सहनशीलतेने वागा. **सावध** असा! कोणाचे वाईटाबद्दल वाईट करू नका परंतु नेहमी चांगले करण्यास तत्पर असा,
१६,१७,१८ आपसात आणि सर्वांचे चांगले करत रहा. **सर्वदा** आनंदित असा. **निरंतर** प्रार्थना करा. **प्रत्येक** गोष्टीत
१९ उपकारस्तुति करा कारण तुमच्याकरता ख्रिस्त येशूमध्ये परमेश्वराची इच्छा हीच आहे. **आत्म्यास** विझवू नका
२०,२१,२२ **संदेशांचा** धिक्कार करू नका. **सर्व** गोष्टींची पारख करा. जे चांगले ते धरून ठेवा. **सर्व** प्रकारच्या वाईटापासून
२३ दूर रहा. **शांतिचे** परमेश्वर स्वत: तुम्हाला पूर्णपणे पवित्र करोत आणि तुमचा आत्मा, जी व शरीर आपल्या प्रभु
२४ येशू ख्रिस्ताच्या आगमनसमयी संपूर्णपणे निर्दोष अशी सुरक्षित राहोत. **तुम्हाला** बोलणारे खरे आहेत, ते असे करतीलच.
२५,२६,२७ **हे बंधूनो**, आमच्याकरता प्रार्थना करा. **सर्व भावांना** पवित्र चुंबनाने सलाम करा. **मी** तुम्हाला प्रभुमध्ये उत्साहित
२८ करतो, की हे पत्र सर्व भावांना वाचून दाखवण्यात यावे. **आपला** प्रभु येशू ख्रिस्त याची कृपा तुमच्यावर होत राहो.

---

**"प्रभु मध्ये"**-मार्क ९:५०; रोम १२:१६; २ करिंथ १३:११; इफि ४:३; फिली २:२; इब्री १२:१४.

५:१४ **"भिणारे व अशक्त"** -स्थानीय मंडळीत सर्व प्रकारचे विश्वासू आढळतात. कोणालाहि तुच्छ समजू नये.

५:१५ **"वाईटाबद्दल वाईट"** - रोम १२:१७-२१.

५:१६ **"आनंदित"** - फिली ३:१; ४:४; रोम १२:१२; हबक्कूक ३:१७,१८.

५:१७ दुसऱ्यांना प्रार्थनेसाठी प्रेरित करण्याऐवजी पौलाने स्वत: अधिक प्रार्थना केली. तो स्वत: एक आदर्श होता- १:३; २:१३; रोम १:९,१०; इफि ६:१८; कलस्सै १:३; २ तीमथ्य १:३. तो प्रार्थनेच्या सामर्थ्याविषयी व आशीर्वादाविषयी जाणत होता. कोणत्याहि कार्यात व्यस्त असल्यावर देखील तो प्रभु समोर आपले अंत:करण उघडत असे. जेव्हा एखादा कोणी दूसऱ्या कार्यात व्यस्त असला, तेव्हा नेहमी हे शक्य होत नाही की प्रार्थना करावी किंवा तोंडाने काही बोलावे. प्रार्थना म्हणजे आपले अतं:करण परमेश्वराकडे उंच करणे, मग तोंडातून किंवा ओठातून काही शब्द निघाला नाही तरी चालेल. प्रार्थने विषयी नोट्स आणि इतर वचने उत्पति ८:३२; मत्तय ६:५-१३; ७:७-१२; मार्क ११:२४; लूक ११:१-१३; १८:१-८; रोम ८:२६,२७; इफि १:१७; ६:१८; फिलि ४:६,७; कल १:९; इब्री ११:६; याकोब १:५-८; ५ :१६-१८; १ योहान ५:१४,१५; स्तोत्र ६६:१८; ५:१८; इब्री १३:१५; कल ३:१७; फिलि ४:६; इफि ५:२०; स्तोत्र ५०:१४; ११३:१; लेवीय ७:१२-१३.

**"प्रत्येक गोष्टीत"**-चा अर्थ आहे; परिस्थिति सुखदायक असो अथ्वा नसो सुरक्षा असो किंवा धोका, सोपे जीवन असो अथवा कठीण. जीवनाच्या प्रत्येक परिस्थितित नेहमी अशा बाबी असतात ज्यांच्या निमित्ताने उपकारस्तुति केली जाऊ शकते. आपण या गोष्टीचा अभ्यास करावा. "परमेश्वराची हीच इच्छा आहे." काही बाबतीत आपण परमेश्वराची इच्छा कद्चित जाणू शकत नाही परंतु उपकार स्तुति करणे हीच परमेश्वराची इच्छा आहे.

५:१९ **"आत्म्यास विझवू नका"**-परमेश्वराचा आत्मा विश्वासूच्या हृदयात ऊब ज्योति आणि आत्मिक उत्साह देतो. परंतु पाप बेजबाबदारपणा, अंत:करणाची प्रार्थना हिन दशा, अणि उपकारस्तुतिचा अभाव यामुळे हृदयाची ही अग्नि विझण्याची शक्यता असते. इफि ४:३०.

५:२० **"संदेश-भविष्यवाण्या"**-याचा अर्थ , मंडळीतील त्या लोकांद्वारे संदेश, ज्यांच्यात ही आत्मिक योग्यता होती. पहा रोम १२:६; १करिंथ १२:१०,२८;१४:३.

५:२१ **"पारखणे"** -१ करिंथ १४:२९; १ योहान ४:१; प्रत्येक संदेष्टा किंवा संदेश प्रभुकडून नसतात. मत्तय ७:१५; २ पेत्र २:२; यिर्म १४:१४. प्रत्येक गोष्ट जी म्हटली जाते ती परमेश्वराया वचनाच्या प्रकाशात पारखली गेली पाहिजे.

५:२२ ज्या वाईट गोष्टीला करायची लोकांना इच्छा नसते, त्यापासून दूर राहणे, काही लोक चांगल्या प्रकारे जाणतात. विश्वासूंनी काहीहि वाईट करण्यात रूचि घेऊ नये.

५:२३ **"शांतिचे परमेश्वर"**-रोम १५:३३;१६:२०; १करिंथ १४:३३; फिलि ४:९; २ थेस्स ३:१६; इब्री १३:२०.

**"पवित्र करावे"** - योहान १७:१७-१९ चे नोट्स पहा.

**"संपूर्ण रीतिने"** -पौल अर्धवट पवित्रतेसाठी प्रार्थना करत नाही. आपण स्वत:साठी किंवा इतर विश्वासूं करता अशी प्रार्थना करू नये. अर्धवट पवित्रता अर्धवटच राहणार. मत्तय ५:४८; १ करिंथ १:२; २ करिंथ ७:१.

**"निर्दोष"** - ३:१३ चे वचन पहा.

५:२४ **"खरा"** - अनुवाद ७:९; ३२:४; १करिंथ १०:१३; २ थेस्स ३:३; २ तीमथ्य २:१३; तीताला १:२; १ योहान १:९.

**"ते असेच करतील"** - १ करिंथ १:८,९;फिलि १:६ पहा.थेस्सलनीकेच्या प्रत्येक विश्वासूशी ही प्रतिज्ञा केली गेली होती. (वर्तमान काळातील सर्व विश्वासूंशी देखील) काही विशेष पवित्र आणि आत्मिक समज ठेवणाऱ्या लोकांशी नव्हे. ५:२५; रोम १५:३०; इफि ६:१९.

५:२६ **"चुंबन"**- रोम १६:१६.

५:२७ या पत्रात दिलेली सत्याची आवश्यकता संपूर्ण कुटुंबासाठी आहे. प्रेषितांच्या निर्देषासह.

५:२८ रोम १:७; १६:२०.